सोमवार, दि. १४ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३३८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मराठा समाजाने शिक्षण, उद्योगात अग्रेसर व्हावे - आ. अर्जुनराव खोतकर

### स्वा. सै. रामभाऊजी राऊत मराठा समाज सभागृहाचे उद्घाटन

**जालना । प्रतिनिधी -** वटवृक्षाप्रमाणे अठरापगड जातींना सोबत घेऊन जाणारा मराठा समाज केवळ ग्रामपंचायत ,सोसायटी, पंचायत समिती ,जिल्हा परिषद ,महानगरपालिका, निवडणुका लढवून पदे मिळवण्यातच अडकून पडला आहे शिक्षणाप्रती हवी तशी जागृती समाजात दिसत नाही मराठा समाजाने शिक्षण, प्रशासन, उद्योग, व्यापारात, अग्रेसर व्हावे असे आवाहन विधानमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी केले. तथापि

जालना शहरात मराठा समाजासाठी सुसज्ज सभागृह उभारणी करिता कोट्यवधींचा निधी देऊ, प्रसंगी निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देखील आ. खोतकर यांनी दिली.

शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांच्या विशेष प्रयत्नांतून काद्राबाद परिसरातील राजमहल टॉकीज लगत स्वा. सै. रामभाऊ जी राऊत मराठा समाज सभागृहाचे उद्घाटन रविवारी ( ता.१३) आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठा समाज मंडळाचे अध्यक्ष अंकुशराव राऊत, कार्याध्यक्ष विष्णू पाचफुले, वामनराव राऊत, गणेश राऊत, राजेश राऊत, विमलताई आगलावे, ज्ञानदेव पायगव्हाणे,रमेश गौरक्षक, राजेंद्र गोरे, संजय देठे,अरविंद देशमुख, अशोक पडूळ, भरत मानकर,रामदास जाधव,ओमप्रकाश भिसे, दत्ता काकडे,दिगंबर पेरे, राजाभाऊ गाजरे,सतीश जाधव, सुभाष चोपडे, विठ्ठल शिर्के, दीपक जगताप,मच्छिंद्र शिंदे, सुर्यकांत पवार, सीताराम बाठे, विठ्ठल वायाळ, यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. अर्जुनराव खोतकर यावेळी म्हणाले, मराठा समाज एकत्र करून प्रत्येक चळवळीत अग्रभागी असलेले स्वा. सै. रामभाऊजी राऊत यांच्या नावाने होत असलेल्या सभागृहाला आधार देण्याची संधी आपल्याला लाभली असे त्यांनी नमूद केले. मराठा समाजाला लोकप्रतिनिधित्व, पदे देण्यासोबतच न्याय मिळवून देण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केल्याचे सांगून आगामी महापालिका निवडणुकीत मराठा समाजाने एकसंघ रहावे, असे आ. खोतकर यांनी सांगितले.

अंकुशराव राऊत यांनी मराठा समाजासोबतच अन्य गोरगरीब समाजाला सुद्धा मंगलिक कार्यासाठी सभागृह उपयोगी पडेल असे सांगून विष्णू पाचफुले यांना महापौर करावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

विष्णू पाचफुले यांनी समाजाचे देणे लागतो या भावनेने सभागृह उभारणीत आपण खारीचा वाटा उचलला असे सांगून सध्या छोट्या स्वरूपात सभागृह साकारले असले तरी आगामी दोन वर्षात मोठ्या सहान भूखंडाचा शोध घेऊन सुसज्ज सभागृह उभारले जाईल असा मनोदय विष्णू पाचफुले यांनी व्यक्त केला.



अभियंता पदवी मिळवल्याबद्दल आशिष पाचफुले यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

सुत्रसंचालन ड. अर्जुन राऊत यांनी केले तर राजेंद्र गोरे यांनी आभार मानले. या वेळी मुन्ना गजबी, ओम राऊत, आकाश जगताप, शुभम टेकाळे, हरी नन्नवरे, रमेश शिंदे, आदर्श राऊत, राजेंद्र डुरे, गोविंद गाजरे, राम भुतेकर, राम खांडेभराड, रमेश कवडे, पांडुरंग खैरे, सागर पाटील, आयुष राठोड, राहुल निर्वे, हिरालाल पिपरिये, साईनाथ मोरे, राधाकिसन टिळेकर, यांच्या सह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

युवा आदर्श

### भविष्यवाणी ...

असा होईल विध्वंस
वर्तवी भविष्यवाणी
व्हायरल करे कात्रण
व्हाटसॅपची दिवाणी
सनसनाटी वार्तांकन
करतात अर्धी शहाणी
बुडणारं आहे जग हे
बिनबुडाची कहाणी
चुकून खरी ठरलेली
कात्रणे पाठवे पुराणी
सरळ चालल्या विश्वा
चलबिचल ती हैराणी
खोटे ठरले असेलं जे
त्यांची हळूचं छाटणी
रिकाम चोट वाचकांस
दे झणझणीत चटणी
भाऊ गर्दीत झाकळले
भविष्याभ्यासक गुणी
मिथ्या ठरवी अकारण
भविष्य सुशास्त्रा कुणी
भारंभार रद्दी लिखाणा
अस्वस्थ जरी लेखणी
कधीतरी सत्य दर्शी हो
भविष्यवाणी रे देखणी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## १०० शिक्षक क्लबचा प्रा. दत्ता देशमुख यांना विशेष सन्मान पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कार्यरत असलेल्या १०० शिक्षक क्लबचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये प्राध्यापक दत्ता देशमुख यांचा विशेष सन्मान करण्यात आला. विशेष सन्मान पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. गेल्या ३७ वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे व विविध सामाजिक उपक्रमामध्ये भाग घेणारे, शैक्षणिक क्षेत्रामधल्या विविध प्रशिक्षणांमध्ये सीनियर प्रशिक्षक म्हणून ज्यांचा नाम उल्लेख केला जातो असे प्राध्यापक दत्ता देशमुख यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यक्षेत्राचा आढावा लक्षात घेऊन त्यांनी केलेल्या कार्याचा आणि सामाजिक जीवनात सहकार्याची भूमिका घेण्यात पुढाकार घेण्यात त्यांचा सहकार्य करण्यात त्यांचा पुढाकार असतो. सगळ्या गोष्टींचा विचार करतात तसेच विविध सामाजिक संस्थांचे सभासदत्व, वेद रायगडांचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष असताना इतिहास क्षेत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांवर शिवचरित्र पुष्पांजली ग्रंथांचे लेखन करण्यात व त्यांच्या संपादक मंडळामध्ये हिरवे भाग घेण्यास, महाराष्ट्र इतिहास प्रबोधन संस्थेमध्ये सहभाग तसेच प्रथम शिवचरित्र साहित्य संमेलन भरवण्याच्या कामांमध्ये सहकार्य, शिक्षण क्षेत्रामध्ये उच्च माध्यमिक क्षेत्रामध्ये कार्य करीत असताना वेगवेगळ्या संगणकाचे पदाधिकारी म्हणून कार्यकर्त्यांना त्यांचा हिरीरीने भाग असतो. समाजसेवा,स्काऊट पर्यावरण, या क्षेत्रामध्ये त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे. स्काऊटचा कार्य करत असताना जालना जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव शाळा संपूर्ण विद्यार्थी स्काऊटमेय करण्यामध्ये त्यांचा हातखंडा होता या संदर्भातही त्यांना विशेष सेवा गौरव म्हणून महाराष्ट्र स्काऊट गाईडने गौरविलेले आहे. सर्व कार्याचा गोष्टींचा लक्षात घेऊन शंभर शिक्षक क्लब यांच्या निवड समितीने त्यांचा विशेष सन्मान केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमजी जोशी होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जे एस कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री हे होते.




कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत सोनवणे, कुडे, प्रसिद्ध साहित्यिक हेलकर मॅडम, आदर्श मुख्याध्यापक सेवानिवृत्त मुख्याध्यापक खरात, आदर्श शिक्षक राजे जोशी, तसेच राजेभाऊ मगर १०० शिक्षक क्लब अध्यक्ष, इंगोले माधवले, लिंगायत कुंडलकर, सूत्रसंचालक साजिद, तर संचालक आप्पासाहेब मुळे, आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. विशेष सन्मान केल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातून तसेच सामाजिक क्षेत्रातून सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## नारायण पिंपळे व पंजाब दांदडे शिष्यवृत्ती, नवोदयचे देताहेत मोफत धडे

### मोफत ऑनलाइन क्लासमुळे एक हजारवर विद्यार्थी पात्र

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** कोरोनाच्या काळात २0२0 मध्ये शाळा बंद होत्या. त्यामुळे साधनव्यक्ती नारायण पिंपळे (रा. काळेगाव) व शिक्षक पंजाब दांदडे (रा. जाफराबाद) यांनी मोफत ऑनलाइन क्लास सुरू केले. यामध्ये तेव्हापासून ते नवोदय, शिष्यवृत्ती, एनएमएमएस परीक्षेचे वर्ग घेतात. त्यामुळे मागील चार वर्षांत शिष्यवृत्ती, नवोदय परीक्षेमध्ये एक हजार विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

भविष्यातील पिढी सुजाण नागरिक बनावी, तसेच कोणत्याही क्षेत्रात त्यांनी उच्चांक गाठून नाव उज्ज्वल करावे, हीच आशा मनी बाळगून सातत्य ठेवून हा मोफत ऑनलाइन क्लास सुरू आहे.

डॉ.सतीश सातव यांच्या प्रेरणेतून हा मोफत ऑनलाइन नवोदय क्लास सुरू करण्यात आला. पहिल्या वर्षी थोडा प्रतिसाद कमी होता. मात्र, तरीही नवोदयला चार तर शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी पात्र झाले, एनएमएमएसमध्ये साठ विद्यार्थी पात्र झाले होते. दुसऱ्या वर्षीही अशाच प्रकारचा ऑनलाइन वर्ग घेण्यात आला. यामध्ये पाच विद्यार्थी नवोदयला, तर जवळपास १३५ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेमध्ये पात्र झाले. शिष्यवृत्तीला चार विद्यार्थी पात्र झाले. मागील चार वर्षांपासून हा ऑनलाइन नवोदय, स्कॉलरशिप, एनएमएमएस वर्ग अविरत पणे सुरू आहेत.

जाफराबाद नाही,जिल्हा नाही तर इतर जिल्ह्यातील मुले सुद्धा या क्लासला जॉईन होत असतात. हा जाफराबाद चा मोफत क्लास महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात जाण्यासाठी प्रयत्न होत आहेत. हा मोठा प्लॅटफॉर्म तयार होण्याच्या मार्गावर आहे.

**नारायण पिंपळे साधनव्यक्ती**

विद्यार्थ्यांमध्ये जिद्द निर्माण व्हावी, विद्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन बदलावा, शिक्षणाकडे बघण्याचा सहज सोपा मार्ग शोधल्या जावा, आपल्यातील स्पर्धेच्या युगामध्ये उतरण्यासाठी असलेल्या सुप्त गुणांचा विकास व्हावा, विद्यार्थी स्वयंप्रेरणेने काही गोष्टी शिक्षण क्षेत्रात लागू करता येतील अशा शिकाव्यात, यासाठीच हा मोठा अट्टाहास आहे.

**आदर्श शिक्षक पंजाब दांदडे,**
**तत्कालीन गटशिक्षणाधिकारी**

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वर्गामध्ये ३०० विद्यार्थी झूम प्लॅटफॉर्मवर असतात, तर काही विद्यार्थी यूट्यूबला जॉईन झालेले असतात. यात जालना जिल्ह्यातीलच नाही तर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतूनही विद्यार्थी ऑनलाइन वर्गाला जॉईन होतात. या धकाधकीच्या जीवनात जे विद्यार्थी कोणत्याही प्रकारचा ऑनलाइन क्लास किंवा ऑफलाइन क्लास लावू शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी पिंपळे व दादडे यांचे क्लास सुरू आहेत.

फक्त जाफराबाद तालुक्यातीलच नाही तर जालना जिल्ह्यातील विद्यार्थी जॉइन होतात. विशेष म्हणजे शनिवार, रविवारसह सणासुदीच्या दिवसांमध्येसुद्धा क्लासला सुटी नसते. तसेच दिवाळीच्या सुट्यांमध्ये दहा ते पंधरा दिवस ऑफलाइन क्लास श्री गौरीशंकर महादेव संस्थान गोंधनखेडा या ठिकाणी घेण्यात येतो. जवळपास १०० सराव चाचण्या सोडवून घेतल्या जातात. विद्यार्थ्यांकडून एक रुपयाही फीस घेतली जात नाही.


छत्रपती संभाजी नगर येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयातील शिक्षण निरीक्षक डॉक्टर सतीश सातव यांचे प्रथम येणाऱ्यांना पारितोषिक या मोफत क्लासमध्ये घेतले गेलेल्या चाचणीमध्ये प्रथम येणाऱ्या दहा विद्यार्थ्यांना शिक्षण निरीक्षक सतीश सातव पारितोषिक देतात. तर,

**पान ३ वर**

## टेंभुर्णीत बुधवारपासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** संत शिरोमणी सावता महाराज व संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त टेंभुर्णी ता. जाफराबाद येथे हनुमान संस्थांनच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन विशाल देशमुख याज कडून .१६ पासून आयोजन करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे हे ४१ वे वर्षे आहे. अखंड हरिनाम सप्ताहात काकड आरती, भजन, विष्णुसहस्त्रनाम, गाथा भजन, संत सावता महाराज चरित्र पठण, हरी किर्तन, जागर आदी दैनिक कार्यक्रमांसह ज्ञानेश्वरी पारायण होणार असून ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज कदम हे ज्ञानेश्वरी चे निरूपण करणार आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहात ह भ प निवृत्ती महाराज कोरडे, ह भ प रवींद्र महाराज मदने, ह भ.प. नारायण महाराज पिंपळे,ह. भ.प. संदीप महाराज खंडागळे, ह. भ. प. साक्षीताई अपार, ह. भ. प. ढंगारे महाराज यांची किर्तन सेवा होणार असून २३ जुलै रोजी ह.भ. प. अजबराव महाराज मिरगे यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर आयोजित भव्य महाप्रसादाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. टेंभुर्णी सह परिसरातील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घेण्याची आवाहन हनुमान संस्थान टेंभुर्णी च्या वतीने करण्यात आले आहे.



**संपादकीय**

## महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान

दीड वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गड आणि किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करावेत अशी शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनिस्कोकडे केली होती. केंद्रीय सांस्कृतीक मंत्रालयाने युनेस्कोकडे शिफारस केलेल्या या यादीत रायगड, प्रतापगड , साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, राजगड, सुवर्णगड, पन्हाळगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व तमिळनाडू मधील जिंजी या बारा किल्ल्यांचा समावेश आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनेस्कोकडे केलेली ही शिफारस मान्य झाली असून शिवरायांचे हे १२ किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा युनेस्कोने नुकतीच केली. शिवरायांचे हे बारा किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट होणे ही अभिमानाची बाब आहे. शिवरायांचे हे बारा गड किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट होणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान आहे. या घोषणेने जगभरातील मराठी माणसांची छाती फुगली आहे. जगभरातील मराठी जणांसाठी हा सुवर्णक्षण आहे. या क्षणाची प्रतिक्षा मराठी माणूस गेली कित्येक शतके करत होता. शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होण्यासाठी फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे मतदान पार पाडले यात अनेक देशांनी भारताच्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांच्या गड किल्ल्यांना हा बहुमान प्राप्त झाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराजांचा ऐतिहासिक ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला. अर्थात हा प्रवास सोपा नव्हता शिवरायांच्या या गड किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होण्यासाठी भारताचे एक शिष्टमंडळ गेल्या अनेक महिन्यांपासून कठोर परिश्रम घेत होते. त्यासाठी या शिष्टमंडळाने वीस देशांशी समन्वय साधला. आंतरराष्ट्रीय स्तरावर या शिष्टमंडळाने या गड किल्ल्यांच्या जागतिक वारसा यादीत समावेश का असावा हे पटवून दिले. महाराष्ट्र सरकार, देशाचे सांस्कृतिक मंत्रालय, भारतीय पुरातत्व खाते आणि भारताचे परराष्ट्र मंत्रालय यांचे यासाठी आभारच मानावे लागेल. त्यांच्या एकत्रित प्रयत्नानेच हे साध्य झाले. हिंदवी स्वराज्य स्थापन करताना शिवरायांनी हे गड किल्ले बांधले, जिंकले. हे गड किल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांची माची स्थापत्य हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. ही माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेच्या आणि युद्ध कौशल्याचा मुत्सद्दीनितीने रचलेला भाग आहे हेच अद्वितीय वैश्विक मूल्य आहे. हे गड किल्ले म्हणजे स्वराज्याच्या शौर्याचे आणि समृद्धीचे प्रतीक आहे. मराठा स्वराज्याचे प्रतीक असलेले हे गड किल्ले सह्याद्रीच्या कुशीत उभारले आहेत. ३०० वर्षापूर्वी बांधलेल्या या गड किल्ल्यांच्या तटबंदीतून मराठा राजवटीच्या सामारिक शक्तीचं दर्शन घडलं. स्वराज्याच्या कुशीतील या गड किल्ल्यांमुळेच शिवरायांना शून्यातून स्वराज्य उभारता आले. स्वराज्याचे वैभव असलेले हे गड - किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट झाले पाहिजे ही मराठी माणसांची प्रामाणिक इच्छा होती. आता मराठी माणसांची ही इच्छा पूर्ण झाली आहे. युनिस्कोने ही शिफारस मान्य केल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास जगभर पोहचेल. छत्रपती शिवाजी महाराज केवळ योध्ये नव्हते तर ते लोक कल्याणकारी, परोपकारी राजे होते हे जगासमोर येईल. यानिमित्ताने या किल्ल्यांचा वारसा आणि इतिहास देखील जगासमोर येईल. एखाद्या स्थळाचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करताना सर्वसाधाणपणे ते स्थान नैसर्गिक दृष्ट्या किती समृद्ध आहे आणि इतिहासाचा विचार करून त्या वास्तू किती महत्वाच्या आहेत या निकषावर निर्णय घेतले जातात. याच निकषावर २०१२ साली युनिस्कोने पश्चिम घाटाचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला. अर्थात जागतिक वारसा स्थळांच्या यादीत हे गड किल्ले समाविष्ट झाले म्हणजे आपली जबाबदारी संपली असे सरकार आणि नागरिकांना वाटत असेल तर ते चुकीचे आहे. उलट मी तर म्हणेल महाराजांचे या गड - किल्ल्यांचा या यादीत समावेश झाल्याने आपली जबाबदारी आणखी वाढली आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या या गड किल्ल्यांचा या यादीत झालेला समावेश कायम स्वरुपी टिकवून ठेवण्यासाठी सर्वांना खूप प्रयत्न करावा लागेल कारण जागतिक वारसा यादीत समावेश झालेल्या स्थळांचे संरक्षण आणि संवर्धन होत आहे का, याचे युनेस्कोच्या तज्ञ समितीतर्फे दर काही वर्षानंतर मूल्यांकन केले जाते. संबंधित स्थळांकडे दुर्लक्ष झाल्यास किंवा संरक्षणास बाधा आल्यास त्या स्थळांचा दर्जा काढून घेण्याचा अधिकारी युनेस्कोकडे आहे. युनेस्कोच्या नियमानुसार जर जागतिक वारसा स्थळांच्या नियमांचे पालन झाले नाही तर तो दर्जा रद्दही होऊ शकतो.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यावर पैठण पोलिसांकडून कारवाई

**पैठण । प्रतिनिधी -** येथील पोलिस ठाणे हद्दीमधील गागाभट चौक येथे अवैध वाळू वाहतूक करून नेत असताना पैठण पोलिस ह्याचा कडून दोन आरोपी विशाल वायभट व दादा तवार दोघे राहणार लक्ष्मीनगर ह्यांचा विरुध कलम ३०३(२), ४९ इछ्ड, २१(१)(२)(३)(४)(५) गौण खनिज कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली. तर सदरची कारवाई पैठण पोलिस निरक्षक महादेव गोमारे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ. शेख, पो.ह.गायकवाड सह आदिनी केली.

# कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करावे आणि राजकीय पुढाऱ्यांनी ऐशोआराम करावे हा कुठला न्याय?

शेतकरी हा राबराब राबतो व मेहनत करतो उन, पाऊस, वादळ, सुनामी, अवकाळी पाऊस यांच्याशी संघर्ष करतो तेव्हा त्यांच्या शेतातून धान्य पिकते व उत्पादन होते.अशाप्रकारे अनेक संघर्ष दरवर्षी करीत असतो व जनतेच्या पोटाची खळगी भरण्याचे काम करतो.परंतु आलेल्या पिकाला योग्य भाव मिळेल की नाही याचीही त्याला चिंता असते.कारण पहिलेच तो कर्जामध्ये डुबलेला असतो व परिवार चालविण्यास अडचण निमर्ण होते अशा परिस्थितीत शेतकरी आत्महत्या करतांना दिसतात. आज शेतकऱ्यांच्या शेतीची किंमत लावली तर करोडोंची असुन सुद्धा तो गरीबीत वावरतो आणि राजकीय पुढारी मात्र पाच वर्षांत आपोआप करोडपती होतात त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या खऱ्या वेदना राजकीय पुढारी समजूच शकत नाही.कारण राजकीय पुढाऱ्यांवर कधी आत्महत्येची पाळीच येत नाही.शेतकरी वर्ग आत्महत्या करणार नाही अशा योजना सरकारने अमलात आणायला पाहिजे.शेतकरी कष्ट करतो तरी पैशांनी शुन्य! राजकीय पुढारी समाजसेवा करतात म्हटले जाते,मग हे कसे काय करोडपती होतात? असाही प्रश्न उपस्थित होतो!आज राज्यासह देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बीकट आहे.कारण आज कोणाजवळ, बैलबंडी नाही तर कोणाजवळ शेती करण्यास पैसा नाही असेही अनेक शेतकरी राज्यासह देशात दिसून येतात.शेतकरी शेतीने व मनाने कितीही मोठा असला तरी मात्र पैशांनी अत्यंत कमकुवत आणि गरीब आहे. त्यामुळेच आज शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतांना दिसतात हे कृषिप्रधान देशाचे व स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.या उलक आपण विचार केला तर देशासह राज्यातील आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री यांच्या जवळ मोठ्या प्रमाणात शेती व चल-अचल संपत्ती दिसून येते व आज करोडपती आहेत याला कोणते व कसले समाजसेवक म्हणावे!ही बाब देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला अजून पर्यंत समजलीच नाही. आज आमदार-खासदार-मंत्री करोडोंचे घोटाळे करतात व यांना सरकार आणि न्यायपालिकेकडुन क्लिनचीट मिळते व राज्याचे मंत्री म्हणून पुन्हा विराजमान होतात हे कोणते समाज सेवक म्हणावे!आज राजकीय पुढारी सर्वसामान्य जनतेच्या डोळ्यात धूळफेक करीत आहे व मेहनत न करता करोडोंची चल-अचल संपत्ती जमा करीत आहे हे लोक एवढी संपत्ती जमा करून ठेवतात की सात पिढ्या बसुन खावु शकेल.परंतु शेतकरी राबराब राबतो दिवसरात्र काबाडकष्ट करून १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरतो अशा अन्न दात्यावर आज आत्महत्येची पाळी येते ही कीती लाजीरवाणी गोष्ट म्हणावी! म्हणजे आज शेतकरी उपाशी आणि राजकीय पुढारी तुपाशी असल्याचे स्पष्ट दिसून येते.आज भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत तरीही कृषिप्रधान देशातील शेतकरी गरीबीच्या खाईत गुदमरत आहे आणि जेव्हा गरीबी आपली सिमा रेषा ओलांडते तेव्हाच शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येते. महाराष्ट्रासह देशातील कोणत्याही राज्य सरकारांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत ठोस असे कोणतेही पाऊल उचलले नाही जर उचलले असते तर शेतकऱ्यांवर आत्महत्ये वेळ कदापि आलीच नसती.परंतु आपल्या देशात उलट आहे जे मेहनत आणि काबाडकष्ट करतात तो शेतकरी दिवसेंदिवस गरीबीच्या खाईत दबत आहे व राजकीय पुढारी दिवसेंदिवस अती श्रीमंत होतांना दिसत आहे. आज राजकीय पुढाऱ्यांजवळ येवढा पैसा आहे की देशाला तब्बल दहा वर्षे कोणाही जवळुन कर्ज घेण्याची गरज नाही.राजकीय पुढारी समाज सेवा करतात असे म्हटल्या जाते मग समाजसेवा करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांजवळ येवढा पैसा येतो कोठून यांच्यावर आत्महत्येची पाळी का येत नाही? यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढाऱ्यांना अमाप पगार वाममार्गाने पैसा कमविण्याची योग्य सुविधा या सर्वांच उपलब्ध असतात. त्यामुळे यांचे पाप शेतकऱ्यांना भोगावे लागते व आत्महत्येची वेळ येते ही अत्यंत गंभीर बाब आहे यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.आज नंदुरबार जिल्ह्या सारखे अनेक जिल्हे राज्यात आहेत की त्या ठिकाणी सरकारकडून मुलभूत सुविधा अजून पर्यंत उपलब्ध नाहीत. तरीही सरकार फक्त घोषणांचा पाऊस पाडतात व बघ्याची भूमिका घेतांना दिसतात.असे अनेक जीवंत उदाहरण आपण सर्वांनीच पाहिले. राज्यात किंवा देशात कोणतीही सरकार असो ते सर्व एकाच माळेचे मणी असतात.कारण आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विचार केला तर २००४ ते २०१३ या १० वर्षात ३६८४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर २०१४ ते २०२४ या ११ वर्षाच्या कालावधीत ४०९८२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या यावरून आपण समजू शकतो की शेतकऱ्यांची कीती भयावह स्थिती आहे.कारण शेतकऱ्यांच्या गंभीर व बिकट परिस्थितीमुळे त्यांच्या आत्महत्या थांबता-थांबेना! परंतू राजकीय पुढारी मात्र समाजसेवेच्या नावावर मस्त मजा करतांना दिसतात त्यामुळे यांच्यावर आत्महत्येची पाळी येतच नाही.कारण हे सर्वच शेतकऱ्यांचे रक्त पितांना दिसतात.ज्याप्रमाणे देशात व राज्यात राजकीय पुढाऱ्यांचे कमाईचे साधन आहे तसे साधण शेतकऱ्यांजवळ नसल्याने त्यांच्यावर आत्महत्येची पाळी येते.त्यामुळे हे मायबाप सरकार राजकीय पुढारी कधीच आत्महत्या करीत नाही त्याचप्रमाणे शेतकरी सुध्दा आत्महत्या करणार नाही अशी काही तरी योजना सरकारने ताबडतोब अंमलात आणावी याचे राज्याच्या जनतेसह देशाची जनता स्वागतच करेल. शेतकरी हा मनाने एवढा श्रीमंत आहे की आपण त्याची कल्पना सुद्धा करू शकत नाही. परंतु पैशांने मात्र शुन्य आहे ही मोठी तफावत शेतकरी आणि राजकीय पुढारी यांच्यात दिसून येते.राजकीय पुढारी समाजसेवेच्या नावाखाली करोडो रुपये कमवितात व शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतात.यावर महामहीम राष्ट्रपती, प्रधानमंत्री, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, कृषीमंत्री,केंद्र सरकार व संपूर्ण राज्य सरकारांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे.कारण शेतकरी जगला तरच आपण जगू. त्यामुळे शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करणे काळाची गरज आहे.जय जवान जय किसान; जय हिंद.





**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# माणसाने जीवनभर नुसता पैसाच कमवायचा का?

आजकाल माणूस पैसा कमावण्याच्या नादात बेभान व उतावीळ झाला आहे. त्याला पैसा कमावण्याच्या पलीकडे दुसरे काही सुचतच नाही. फक्त पैसा कमावणे आणि गडगंज संपत्तीचा मालक होणे, हेच त्याचे जीवन ध्येय बनले आहे. भरपूर पैसा व संपत्ती मिळवण्यासाठी माणूस दिवसरात्र मेहनत व काबाडकष्ट करताना दिसत आहे. त्याला पैसा हेच सर्वस्व आहे, असे वाटत आहे. म्हणून तो स्वतःचा व स्वतःच्या परिवाराचा विचार न करता पैशाच्या मागे सुसाट वेगाने धावत सुटला आहे. कोणी इमानदारीने शेतात काबाडकष्ट करून व घाम गाळून पैसा कमावत आहे, तर कोणी अफरातफर करून व भ्रष्टाचार करून अमाप संपत्ती व पैसा जमवत आहे. आणि गडगंज पैसा व संपत्ती कमावून आपले घर व बँक पैशाने खचाखच भरत आहे. आलिशान गाडी व आलिशान बंगला खरेदी करत आहे. आणि समाजात व गावात श्रीमंतीचा थाट मिरवत आहे. अशा लोभी व हावरट लोकांचा सुळसुळाट आता प्रत्येक समाजात व प्रत्येक क्षेत्रात खूप वाढला आहे. म्हणून मला अनेकदा राहून राहून प्रश्न पडतो की, माणसाने जीवनात एवढा पैसा कशासाठी कमवायचा? माणसाला जीवन हे केवळ पैसा कमावण्यासाठीच मिळाले आहे का? केवळ भरपूर पैसा कमावल्यानेच माणसाच्या जीवनाचे सार्थक होणार आहे का? पैशापुढे आपण नातीगोती व सगेसोयरे विसरून आपल्याच दुनियेत रममान झालो आहोत. स्वतःचे आईवडील मरो, नातेवाईक मरो किंवा घरातील एखादा सदस्य मरो, याचे आपल्याला काहीच दुःख वाटत नाही. आपण एका दिवसाची सुट्टी घेऊन त्याच्या अंत्यविधीला सुद्धा जाण्यासाठी तयार होत नसतो. असे कित्येक नोकरदार मी पाहिले आहेत, जे की स्वतःचे आईवडील किंवा स्वतःचा भाऊ मरण पावल्यावर त्याच्या अंत्यविधीला सुद्धा आले नाहीत. त्यांना वाटत असते की, सुट्टी घेतल्यावर माझे खूप मोठे आर्थिक नुकसान होईल, माझा उद्योग बंद पडेल म्हणून ते अंत्यविधीला जाण्यास साफ नकार दर्शवतात. तसेच घरातील जवळच्या नातेवाईकाचे लग्न असो, जिवलग मित्राचे लग्न असो वा भावकीतील कोणाचे लग्न असो अथवा कोणता सण-उत्सव असो किंवा कोणाचा कार्यक्रम असो, हे महाभाग आपल्या कामात खाडे पडतील किंवा आपला धंदा बंद पडेल म्हणून गावाकडे जाण्यास टाळाटाळ करतात. कारण काही जणांना वाटत असते की, आपण कामात गैरहजर राहिल्यावर मालक आपल्याला पैसे कमी देईल आणि आपले प्रचंड आर्थिक नुकसान होईल या भीतीपोटी त्यांना काम सोडून गावाकडे जायला नको वाटते. जीवनात माणसाने कितीही पैसा कमवत राहायचे आणि आपल्या बायको मुलांकडे, मित्र परिवाराकडे, नातेवाईकांकडे आणि आई-वडिलांकडे दुर्लक्ष करायचे, त्यांना सुख-दुःख विचारायचे नाही, त्यांच्या सहवासात बाहेर हिंडायचे नाही, त्यांच्यासोबत महत्त्वाच्या गोष्टीवर विचार विनिमय करायचा नाही, हितगुज साधायचे नाही, मुलांना अभ्यासाबद्दल विचारायचे नाही, कुटुंबासोबत एकत्रित बसून चर्चा करायची नाही, येऊन जाऊन फक्त पैसा कमवत राहायचा, हे असे कसे चालणार? माणसाने भरपूर पैसा कमावला म्हणजे तो जीवनात यशस्वी झाला, असे म्हणता येणार नाही. पैसा तर कमवावाच लागतो. पण अगोदर इतर सर्व गोष्टी सांभाळाव्या लागतात. म्हणजे स्वतःच्या परिवारासोबत वेळ द्यावा लागतो, स्वतःच्या बायको मुलांसाठी काही वेळ आरक्षित ठेवावा लागतो. आई-वडिलांना जीव लावावा लागतो, मित्रांच्या सहवासात काही वेळ घालवावा लागतो, नातेवाईकांना ख्यालीखुशाली विचारावी लागते आणि स्वतःच्या शारीरिक व मानसिक स्थितीचा विचार करून मग आपला उद्योग व व्यवसाय करावा लागतो. पण आजकाल या गोष्टीचा विचार न करता माणूस पैसा कमावण्यासाठी स्वतःच्या जीवाची परवा न करता दिवसरात्र पैसा कमावत आहे. त्याला पैशापुढे स्वतःच्या बायको मुलांना व आई-वडिलांना वेळ देण्यासाठी वेळ राहिला नाही. मित्रपरिवार, नातेवाईक व समाज बांधव हे तर दूरच राहिले. दिवसभर काम करणे आणि संध्याकाळी घरी आल्यावर मोबाईल बघत झोपी जाणे. परत सकाळी उठून कामावर जाणे आणि संध्याकाळी परत घरी येणे, असा दिनक्रम आजकालच्या बहुतांश लोकांचा झाला आहे. एक-दोन दिवसाची रजा घेऊन बायको लेकरांना वेळ द्यावा, त्यांच्या सहवासात दोन-चार दिवस घालवावे, त्यांना निसर्गरम्य ठिकाणी फिरायला घेऊन जावे, मुलांसोबत अभ्यासाच्या विषयावर चर्चा करावी, मित्रांसोबत मनसोक्त गप्पा माराव्यात, आई-वडिलांसोबत राहून मनमोकळे करावे, असे त्यांना बिलकुल वाटत नाही. त्यांना वाटत असते की, आपण जर सुट्टी घेऊन घरी राहिलो तर आपल्याला खूप मोठा आर्थिक फटका बसेल, आपले झालेले आर्थिक नुकसान कोण भरून काढेल? या भीतीपोटी त्यांना सुट्टी घ्यायला नको वाटते. म्हणून आजकालची माणसे पैशाच्या अति हव्यासापोटी मनोरुग्ण होत आहेत. त्यांना मनाजोगे पैसे मिळाले नाही की, ते मानसिक ताण घेऊन टोकाचा निर्णय घेत आहेत. म्हणूनच देशात मनोरुग्णांची संख्या सध्या वाढत चालली आहे. पैशाची एवढी प्रचंड हाव आजकालच्या लोकांना झाली आहे. आता तुम्हीच सांगा मित्रांनो, पैशाची एवढी हाव काय कामाची आहे? ज्यांना स्वतःच्या जीवापेक्षा पैसा प्यारा आहे, त्या माणसांना माणूस तरी कसे म्हणावे? म्हणजे त्यांना माणसांपेक्षा व स्वतःच्या जीवापेक्षा भारी पैसा वाटत आहे. म्हणून ते स्वतःच्या शारीरिक व मानसिक स्थितीकडे दुर्लक्ष करतात. स्वतः आजारी पडले तरी सुट्टी घेऊन दवाखान्यात जात नाहीत. कितीही महत्त्वाचे काम असू द्या, ते आपल्या कामाचा कधीच खाडा होऊ देत नाहीत. त्यांना या जगात आई-वडिलांपेक्षा व बायको लेकरांपेक्षा पैसा महत्त्वाचा वाटतो. म्हणून ते पैसा कमावण्यासाठी सारखी जीवाची मरमर करत असतात. मग तुम्हीच सांगा बांधवांनो, पैशाचा एवढा हव्यास कशासाठी? माणसाने पैसा कमवावा पण जेवढा गरजेचा आहे तेवढाच! त्या पैशांमध्ये आपले कुटुंब व आपण सुखाने आणि आनंदाने जगावे आणि त्यात आपल्या मुलांचे शिक्षण व्यवस्थित पार पडावे एवढा मुबलक पैसा आपल्या जवळ जरूर असावा. पण यापेक्षा जास्त पैशाची हाव बरी नाही. कारण पैशाची जास्त हाव माणसाला दुःखी बनवते. माणसाने कितीही पैसा कमावला तर त्या पैशाला काहीच अर्थ राहणार नाही. शेवटी एक दिवस माणसाला सगळा पैसा व संपत्ती जाग्यावर सोडून जावे लागणार आहे. माणूस शेवटी काहीच घेऊन जात नाही. आणि एकदा मिळालेले जीवन हे पुन्हा पुन्हा येत नाही. म्हणून दिवसरात्र पैशाच्या मागे धावत पळत सुटण्यापेक्षा जरा स्वतःकडे व स्वतःच्या परिवाराकडे लक्ष द्या. दुःखी, पीडित व गरजू लोकांना आर्थिक मदत करा. सामाजिक व धार्मिक कार्यात स्वतःला झोकून द्या. अनाथाश्रमांना व वृद्धाश्रमांना अन्नदान, कपडे व इतर भेटवस्तू देऊन त्यांना मायेचा आधार द्या. गोरगरीब मुलींच्या लग्नाला थोडाफार आर्थिक हातभार लावा. असे केल्याने जीवनात एक वेगळाच आनंद निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. पण आयुष्यभर नुसता पैसाच कमवत राहिलात, स्वतःकडे व स्वतःच्या परिवाराकडे लक्ष न देता केवळ पैशालाच महत्त्व देत राहिलात तर तुमच्या जीवन जगण्याला काहीच अर्थ उरणार नाही. तुम्ही जन्माला येण्यापेक्षा आईच्या गर्भातच मेले असते तर बरे झाले असते. असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अशा लोभी व हावरट लोकांनी कधीतरी स्मशानात जाऊन पाहिले तर त्यांना कळेल की, आपल्यापेक्षा पैशाने कितीतरी मोठ्या व श्रीमंत असणाऱ्या व्यक्ती राख झाल्या आहेत. सगळा पैसा, संपत्ती, गाडी व बंगला जाग्यावर सोडून या जगातून त्या कायमच्या निघून गेल्या आहेत. म्हणून बांधवांनो, सारखा पैसा पैसा करण्यापेक्षा, दिवस-रात्र पैशाच्या मागे धावण्यापेक्षा, केवळ पैशालाच महत्व देण्यापेक्षा, बेभान होऊन पैसा कमावण्यापेक्षा, पैशापुढे घर परिवार, नातेवाईक आप्तेष्ट व मित्रपरिवार यांना विसरण्यापेक्षा आणि स्वतःच्या जीवाकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा आपल्याला जीवन जगण्यासाठी जेवढा पैसा आवश्यक आहे तेवढाच पैसा कमवावा...स्वतःच्या पत्नीला व मुलांना वेळ द्यावा. घरातील आई-वडिलांची सेवा करावी, मित्रांमध्ये काही वेळ व्यतीत करावा...पैशापेक्षा माणसे महत्त्वाची समजून माणसांना महत्त्व द्यावे, जो माणूस सारखा पैशाच्या मागे धावतो त्याला जीवनात कधीच सुख मिळत नाही, सुखी जीवन जगण्यासाठी माणसाने माणसाचे कर्तव्य सांभाळत कष्ट करणे आणि पैसा कमावणे हेच सुखी जीवन जगण्याचे तंत्र आहे. उगीच पैशाच्या मागे धावून स्वतःचे शारीरिक व मानसिक नुकसान करून घेण्यापेक्षा स्वतःच्या जीवाला, स्वतःच्या आई-वडिलांना आणि बायको लेकरांना वेळ देऊया आणि सुखी व आनंदी जीवन जगूया...

**-बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## महापालिका अधिकाऱ्यांच्या दालनातील नियमबाह्य एसी तात्काळ काढा

### सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** शहर महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या दालनामध्ये बसवण्यात आलेले सर्व एसी हे नियमबाह्य पद्धतीने बसवण्यात आले असून नियमांचं पालन न करता हे एसी बसवण्यात आले आहेत सरकारने काढलेल्या अध्यादेशातील सर्व नियम हे एसी बसवताना धाब्यावर बसवण्यात आले आहेत त्यामुळे हे नियम बाह्य एसी तात्काळ काढून त्याचा खर्च संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावा अशी मागणी साद बीन मुबारक यांनी विभागीय आयुक्त संभाजीनगर यांना निवेदन देऊन केलेली आहे.शासनाची कोणतीही परवानगी न घेता किंवा अधिकार नसताना जालना शहर महा नगरपालिकेच्या आयुक्तांसह सर्वच अधिकाऱ्यांनी हा प्रताप केला असून यावर ५ लाखांचा खर्च हा जालना महानगर पालिकेच्या तिजोरीतून केला आहे.या अधिकाऱ्यांच्या दालनातील एसी तात्काळ काढून घ्यावे जनतेच्या पैशातून खर्च करण्यात आलेला निधी अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावा आणि या एसीचे वीज बिल सुद्धा अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी विभागीय आयुक्त संभाजीनगर यांच्याकडे मागील पाच ते सहा दिवसांपूर्वी तक्रार करून केली होती. परंतु अद्याप पर्यंत यावर कोणतीही कारवाई झालेली नाही त्यामुळे मुबारक यांनी थेट विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. अधिकाऱ्यांना एसी मध्ये बसण्याची सवय झाल्याने शहरातील नागरिकांच्या समस्या कडे पाहण्यास त्यांना वेळ नाही. शहरातील गल्लीबोळामध्ये अधिकारी कधी फिरकत नसल्यामुळे नागरिकांच्या समस्या त्यांच्या लक्षात येत नसल्याचेही साद बीन मुबारक म्हणाले.

### मंठा येथे शिवसेना (उद्धव ठाकरे) बैठकीत विविध विषयावर चर्चा

## आगामी जि.प. व पं.स. निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे

### जिल्हाप्रमुख महेश नळगे यांचे आवाहन



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सद्गुरू अर्बन बँकेत उबाठा शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक रविवार (ता. १३) रोजी पार पडली. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन जिल्हाप्रमुख महेश नळगे आणि तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी केले.

या बैठकीला उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, आसाराम बोराडे, तालुका संघटक ज्ञानेश्वर माऊली सरकटे, संजय नागरे, युवा सेना तालुकाप्रमुख दिगंबर बोराडे, आसाराम बोराडे, देविदास खरात, अनंता वैद्य, अशोक खंदारे, शिवाजीराव मोरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

या बैठकीत निर्वाचित जिल्हाप्रमुख महेश नळगे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच देविदास खरात यांची उपतालुका प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. त्याचबरोबर युवा सेनेच्या उपतालूकाप्रमुखपदी गोरखनाथ चव्हाण, केंधळी सर्कल उपविभागप्रमुखपदी शेख रजाक, सोशल मीडिया शहरप्रमुखपदी पंकज पंडित, देवगाव खवणे उपविभागप्रमुखपदी विजय दवणे, सोशल मीडिया जयपुर सर्कल ओमकार केंधळे, उपविभागप्रमुख पाटोदा सर्कल महादेव कव्हळे, तळणी उपविभागप्रमुख सदाशिव लाड, जयपूर विभागप्रमुख शिवाजीराव मोरे, तळणी विभाग प्रमुख पदी अशोकराव खंदारे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाप्रमुख श्री नळगे म्हणाले की, मंठा तालुका हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून हा अभेद्य राहण्यासाठी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जिंकायच्या आहेत त्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे आवाहन केले. उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे म्हणाले की, मंठा शहरात वार्डनिहाय शाखांचे नियोजन, तसेच ग्रामीण भागात शिवसेनेचे संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले.

## राज्य व विभागीय अधिस्वीकृती समित्यांविरोधात याचिकेवर १२ ऑगस्ट २०२५ रोजी उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी




**छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) । विशेष प्रतिनिधी-** महाराष्ट्र शासनाने दिनांक ११ जुलै २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय अधिस्वीकृती समिती तसेच नऊ विभागीय अधिस्वीकृती समित्यांची स्थापना केली होती. या समित्यांची स्थापना करण्यापूर्वी मान्यता प्राप्त पत्रकार संघटनांची चौकशी करण्यात यावी, अशी विनंती प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राने शासनाकडे केली होती. मात्र, सदर विनंतीची दखल न घेता शासनाने अपात्र पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींना अनुचित लाभ मिळावा या हेतूने सदर समित्यांची स्थापना केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निर्णयाला आव्हान देत, प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक १००७०/२०२३ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेवर अंतिम सुनावणी दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राने वर्ष २०१९ ते २०२३ दरम्यान शासनाला सातत्याने लेखी निवेदने सादर करून अधिस्वीकृती नियमावलीमध्ये नमूद असलेल्या पत्रकार संघटनांची चौकशी पूर्ण केल्याशिवाय अधिस्वीकृती समित्यांची स्थापना करू नये, अशी मागणी केली होती. तथापि, शासनाने या निवेदनांची कोणतीही कार्यवाही न करता दिनांक ११ जुलै २०२३ रोजी राज्य व विभागीय अधिस्वीकृती समित्यांची स्थापना केली.

याचिकेमध्ये असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, शासनाने माध्यमांच्या अधिस्वीकृती प्रक्रियेतील स्वायत्तता व पारदर्शकतेचा भंग करून प्रशासकीय नियंत्रणाखालील समित्यांची स्थापना केली आहे. ही कृती संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या तत्त्वांना बाधक असून, माध्यम स्वातंत्र्यावर आघात करणारी आहे.

सदर याचिकेवर दिनांक २१ ऑगस्ट व ४ सप्टेंबर २०२३ रोजी प्रारंभिक सुनावणी पार पडली होती. त्यानंतर, न्यायालयाने याचिका दाखल धरून घेत रिट याचिकेत पुढील सुनावणी अनिश्चित काळासाठी तहकूब केली होती.

प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राने वर्ष २०२५ मध्ये सादर केलेल्या सिव्हिल प्लिकेशन क्रमांक ९०२/२०२५ अंतर्गत याचिकेवरील सुनावणी लवकर घेण्याची विनंती करण्यात आली होती. या अर्जावर दिनांक १ जुलै २०२५ रोजी माननीय न्यायमूर्ती श्री. मनिष पितळे व माननीय न्यायमूर्ती श्री. वाय. जी. खोब्रागडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने सिव्हिल प्लिकेशन मंजूर करून मूळ रिट याचिका अंतिम सुनावणीसाठी १२ ऑगस्ट २०२५ रोजी ठेवण्याचे आदेश दिले.

या प्रकरणातील युक्तिवाद, न्यायालयाचे विचारमंथन आणि संभाव्य निर्णयाकडे संपूर्ण राज्यातील प्रसारमाध्यमे, संपादक संघटना तसेच कायदेविषयक क्षेत्रातील तज्ज्ञांचे लक्ष लागून आहे. जाणकारांचे म्हणणे आहे की, सदर याचिकेवरील निर्णय माध्यम स्वातंत्र्य व शासन नियंत्रणाच्या कक्षेबाबत दिशादर्शक आणि ऐतिहासिक ठरण्याची दाट शक्यता आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत दापोडी शाळेचे अभिमानास्पद यश

**पुणे-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये दापोडी येथील जिल्हा परिषद शाळेने उत्तम यश संपादन केले.



शिष्यवृत्ती परीक्षेची राज्य व जिल्हा गुणवत्ता यादी नुकतीच प्रकाशित करण्यात आली. यामध्ये शाळेचे दोन विद्यार्थी श्रेयश संतोष खोडवे (गुण २५८) नवोदय विद्यालय निवड व कु. समर्थ साईनाथ रुपनवर (गुण २५६) या दोन विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. याशिवाय कु. आरोही खंडू खोडवे (गुण २३०), कु.शौर्य किशोर चव्हाण (गुण २२८) व सोहम गणपत सरके (गुण १७६)या विद्यार्थ्यांनी देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या वर्गशिक्षिका पुष्पा किशोर चव्हाण यांनी योग्य नियोजन, सातत्य,व भरपूर सराव या त्रिसूत्रीचा वापर करून हे यश संपादन केल्याचे सांगितले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र फणसे, शाळेतील सर्व सहकारी शिक्षक,केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीम.लता हिंगणे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. नवोदय विदयार्थी निवड, मंथन परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक व शिष्यवृत्ती परीक्षेत मिळालेल्या उत्तुंग यशाबद्दल शाळेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दौंड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संजय महाजन साहेब ,शाळा व्यवस्थापन समिती तसेच समस्त ग्रामस्थ दापोडी यांनी देखील सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.

## ... विषमुक्त शेतीसाठी एकत्र येऊन काम करायला हवे - राहीबाई पोपरे




**नाशिक । प्रतिनिधी -** मी अडाणी बाई, पण मला इतकं कळतं की, मातीला जपलं तर माती तुम्हाला जगवते. म्हणून विषमुक्त शेतीसाठी सारे एकत्र येऊन काम करत राहायला पाहिजे. कॅन बायोसिसचे हे उत्पादन आधुनिक शेती करायला खरचं उपयुक्त आहेत. असे मत पद्मश्री बिजमाता राहीबाई पोपरे यांनी व्यक्त केले. कृषी क्षेत्रातील कॅन बायोसिसच्या इम्पोर्टेड वॉटर सोल्युबल रोफा तसेच नीम प्रणालीतील विविध १५ उत्पादनांचे लोकार्पण करण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या. तसेच यावेळी त्यांनी आपल्या मनोगतातून मातीचे स्वास्थ्य व आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख उद्याच्या भविष्याला करून दिली.

यावेळी ग्रोवनचे संपादक व संचालक आदिनाथ चव्हाण, फार्म डीएसएस ग्रीटेक प्रा. लि. संस्थापक डाळिंबरत्न, बाबासाहेब गोरे, पुण्याचे प्रिंसिपल सायंटीस्ट डॉ. सुजॉय साहा, डी सँगोजचे मुख्य समुह माहिती अधिकारी जेफ फ्रान्को यांच्यासह नाशिक तसेच महाराष्ट्रातील अनेक शेतकरी मान्यवर उपस्थित होते

याप्रसंगी बोलतांना कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालीका संदीपा कानिटकर म्हणाल्या, रोफा म्हणजे रिअल ऑप्टिमाईज्ड फर्टिलायझर अप्लिकेशन असलं तरी, माझ्यासाठी आर म्हणजे शेतकऱ्यांचा रिस्पेक्ट (आदर) आहे. रोफा हे फ्रान्स मधील तंत्रज्ञान भारतात उपलब्ध करून देण्यासाठी कॅन बायोसिसने डी सँगोज कंपनी सोबत करार केला असून या श्रेणीतील १२ उत्पादने पूर्णतः पाण्यात विरघळणारी, सर्व फळबागा व भाजीपाला पिकांसाठी कुठल्याही हवामानात प्रभावी आहेत. नीम श्रेणीतील सर्व गुणवत्तापूर्ण उत्पादने विषमुक्त कृषी क्षेत्रात क्रांती आणणारी आहेत. त्यामुळे कॅन बायोसिसने आता जगाला शाश्वत शेतीचा खात्रीशीर पर्याय उपलब्ध करून दिला असल्याची भावना मंचावरील उपस्थित तज्ज्ञांनी व्यक्त केली.

## शिवस्फूर्ती प्रगती मंडळाच्यावतीने शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**घाटकोपर -** सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या घाटकोपर पश्चिम येथील शिवस्फूर्ती प्रगती मंडळ यांच्या वतीने रामनगर नगर (अ ) येथे मंडळाच्या कार्यालयात अध्यक्ष हरेश आण्णा धांद्रुत यांच्या पुढाकाराने तसेच घाटकोपर इन्स्ट्रियल मधील उद्योजक प्रविण तोतरे व प्रकाश पाटील यांच्या सहकार्याने विभागातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख मान्यवर घाटकोपर इन्स्ट्रियल येथील उद्योजक प्रविण तोतरे व प्रकाश पाटील यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित सर्व विद्यार्थांनी ही आपल्यातील कला यावेळी सादर केली.यावेळी या कार्यक्रमाला शिवस्फूर्ती प्रगती मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी देखील उपस्थित होते.

**Name Change**

Old Name - **Sadeek Khan Pathan**
New Name- **Sadeek Shamshir Khan**

**Name Change**

Old Name- **Bushra Begum**
New name- **Bushra Sadeek Khan**

## दोन भाऊ एकत्र येणे हा महाराष्ट्रासाठी सुवर्णक्षणच

**विशाल देशमुख**

हिंदी सक्तीचा जीआर राज्य सरकारने रद्द केल्याचा आनंद साजरा करण्यासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे वरळीतील एन एस सी आय डोम येथे आयोजित मेळाव्यात राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर,माकापाचे अजित नवले,मराठी भाषा केंद्राचे प्रा.दिपक पवार,भाकपाचे कॉ.प्रकाश रेड्डी,शेकपाचे माजी आमदार जयंत पाटील,शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड,आणि माजी खासदार शिक्षणतज्ञ भालचंद्र मुणगेकर, आणि मराठी माणसाने एकजूट दाखवली काल जो मेळावा आयोजित करण्यात आला होता तो मेळावा कोणत्याही राजकीय पक्षाचा कार्यक्रम नव्हता कोणताही पक्षाचा झेंडा नाही फक्त मराठीचा अजेंडा होता आताचे राजकारण पाहता राजकारणामध्ये हे दोघे भाऊ एकत्र येणे ही काळाची गरज होती.मराठी भाषेचा मुद्दा हे तर कारण ठरलं राजकारण हे जर त्यांना करायचं



असतं तर ते इतक्या दिवस थांबले नसते विधानसभेच्या निवडणुकीमध्ये दोन भाऊ एकत्र आले असते पण हे एकत्र येणं म्हणजे निखळ महाराष्ट्राच्या हितासाठी मराठी माणसाच्या हक्कासाठी आहे.दोन भाऊ एकत्र आल्याने फक्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे किंवा शिवसेना उ.बा.ठा. चे कार्यकर्तेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी माणसाला आनंदाचा क्षण निर्माण झालेला आहे.या क्षणाची संपूर्ण महाराष्ट्र गेल्या कित्येक वर्षापासून आतुरतेने वाट पाहत होता हा क्षण काल ५जुलै २०२५रोजी महाराष्ट्र ने ह्याची डोळा याची देही अनुभवला आहे. गेल्या कित्येक वर्षाचा प्रतीक्षेनंतर काल फक्त राजकीय कार्यकर्तेच नव्हे तर महाराष्ट्राला प्रत्येक मराठी माणूस हा अत्यंत आनंद होता.दोन्ही पक्षाची विचारसरणी व ध्येय सारख्या असल्याकारणाने हे दोन्ही पक्ष एकत्र येण्याची अत्यंत गरज होती.आणि तसेच राज्यातील जनता या दोघा बंधूंच्या हाती सत्ता देऊन महाराष्ट्राची अस्मिता जपण्यासाठी मराठी माणूस संधी देईल.त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या विकासाला गती तर मिळणारच आहे.तसेच अनेक क्षेत्रातून मराठी माणूस बाहेर फेकला जात आहे.यासाठी दोन्ही पक्ष प्रयत्न करतील की संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठी माणसाला प्राधान्य मिळायला पाहिजे दोन्ही भाऊ बंधू एकत्र येऊन बाळासाहेबांचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले आहे.कोणी म्हणतो मराठीसाठी कोणी म्हणतो महानगरपालिकेसाठी पण राज साहेब आणि उद्धव साहेब हे फक्त महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र आलेले आहेत.या दोन्ही नेत्यांना एकत्र येण्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड प्रचंड उत्साह व जोश संचारला आहे.



प्रत्येकाच्या मनात जो आनंद आज होता तो कोणीही शब्दांमध्ये व्यक्त करू शकत नाही, मनसे सैनिक आणि शिवसैनिक सुखावले महाराष्ट्रात मराठीच ! मराठी माणसाच्या एकजुटीचा विजय आहे,

**पंढरीनाथ म्हस्के, मनसे सरचिटणीस तालुका जाफ्राबाद**

**पान १ वरुन**

### नारायण पिंपळे ...

ऑफलाइन क्लासला सुट्यांमध्ये उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सोपान शिंदे, पंजाब दांदडे, पंजाब क्षीरसागर चहा-नाश्ता, पाण्याची व्यवस्था करतात.

जाफराबाद तालुक्यातील आदर्श शिक्षक तथा नवभारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर सर यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की पंजाब दांदडे आणि नारायण पिंपळे यांनी मोफत स्पर्धा परीक्षा मंच सुरू केला आहे त्या मार्फत जाफराबाद तालुक्यातील स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाइन क्लास देत असतात. यामध्ये शिष्यवृत्ती एन एम एम एस नवोदय, यासारख्या परीक्षांची तयारी करून घेतल्या जाते खरंतर जिल्हा परिषद असो किंवा महाराष्ट्र शासन असो या सर्वांनी या दोघांना कोणतीही फाईल न करता आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला पाहिजे ही सर्व शिक्षण क्षेत्रातील लोकांची मागणी आहे. ही मागणी पूर्ण झाली तर शिक्षण क्षेत्रामध्ये जाफराबाद तालुका हा अग्रेसर राहील यात शंका नाही.

# अधिस्वीकृती पत्रिकेसाठी असलेली कोटा पद्धत रद्द करावी - देवेंद्र भुजबळ

**मुंबई -** पत्रकारांसाठी शासनाच्या असलेल्या योजना, सवलती, तरतुदी यांचा लाभ मिळण्यासाठी संबंधित पत्रकाराकडे अधिस्वीकृती पत्रिका असणे बंधनकारक आहे. त्यामुळे संबंधित वृत्तपत्रास मंजूर असलेल्या अधिस्वीकृती पत्रिकेच्या कोट्यापेक्षा त्या त्या वृत्तपत्रात अधिक पत्रकार असल्यास ते अधिस्वीकृती पत्रिकेसाठी पात्र ठरत असूनही केवळ त्या वृत्तपत्राच्या कोट्यात बसत नाही या कारणामुळे ते अधिस्वीकृती पत्रिकेपासून आणि त्याद्वारे मिळणारे लाभ यापासून वंचित राहतात.यास्तव वृत्तपत्रांसाठी असलेली कोटा पद्धत रद्द करण्याची शिफारस राज्य अधिस्वीकृती समितीने शासनाकडे करावी,अशी सूचना निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी केली. ते ठाणे जिल्ह्यातील प्रसारमाध्यम प्रतिनिधींकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई, कोकण विभागीय माहिती कार्यालय, ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ, नवी मुंबई प्रेस क्लब, ठाणे जिल्हा साप्ताहिक संपादक असोसिएशन, डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारितेची पाठशाळा - बातमी मागची गोष्ट या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.ही कार्यशाळा ठाणे महानगरपालिकेच्या कै.नरेंद्र बल्लाळ सभागृहात नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

श्री भुजबळ पुढे म्हणाले की, पत्रकारांसाठी शासनाच्या वतीने आरोग्य योजना, कल्याण निधी योजना, गृहनिर्माण संस्था ,पत्रकार भवन या साठी जागा आणि काही प्रमाणात आर्थिक मदत, म्हाडा,सिडको च्या घरांमध्ये २ टक्के आरक्षण, एस टी महामंडळाच्या बस मध्ये मोफत प्रवास, शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रांना आणि आता निकष पूर्ण करणाऱ्या डिजिटल माध्यमांना जाहिराती अशा विविध प्रकारे सहाय्य करण्यात येते. पण हे सर्व लाभ मिळण्यासाठी पत्रकार अधिस्वीकृती धारक असण्याची प्रमुख अट आहे.त्यामुळे या अटींची काटेकोरपणे पूर्तता करण्यासाठी पत्रकारांनी सर्व आवश्यक कागदपत्रे अद्ययावत राहतील,याची काळजी घेतली पाहिजे.

पत्रकारितेतील करार पद्धतीमुळे पत्रकारांना श्रमिक पत्रकार कायदा,१९५५ मधील तरतुदींनुसार मिळणारे संरक्षण, वैद्यकीय आणि इतर अनुषंगिक लाभ मिळेनासे झाले आहे.त्यामुळे देश भरातील पत्रकार संघटनांनी एकत्र येऊन करार पद्धतीने काम करीत असलेल्या पत्रकारांना १९५५ च्या कायद्यातील संरक्षण आणि अनुषंगिक लाभ मिळण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली .

याच कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते देवेंद्र भुजबळ यांनी लिहिलेल्या आणि प्रकाशनाच्या वाटेवर असलेल्या,प्रसारमाध्यमातील विविध व्यक्तींवर लिहिलेल्या माध्यमभूषण या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे अनावरण करण्यात आले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर आणि दै.ठाणे वैभवचे संस्थापक व जेष्ठ पत्रकार नरेंद्र बल्लाळ यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यशाळेस ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, कोकण विभागीय माहिती उपसंचालक श्रीमती अर्चना शंभरकर, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी समितीचे सदस्य कैलास म्हापदी, ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे, नवी मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज जालनावाला, ठाणे



पत्रकार संघाचे अध्यक्ष दिपक सोनावणे, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, ठाणे डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रफुल वाघोले, ठाणे जिल्हा साप्ताहिक संपादक असोसिएशनचे अध्यक्ष राजेश जाधव यांच्यासह विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, सदस्य आणि जिल्ह्यातील विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

ऑर्गोनॉमिक्स प्रोग्राम मॅनेजमेंट एक्सपर्ट आणि प्रेरणादायी वक्त्या डॉ. मोना पंकज यांनी दैनंदिन काम काज आणि ताणतणाव व्यवस्थापन याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी यांनी पर्यावरण संवर्धन आणि पत्रकारिता याची सांगड कशाप्रकारे घालता येवू शकेल याविषयीचे मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक भाषणात, कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला यांनी अधिस्वीकृती पत्रिकेबाबत थोडक्यात माहिती देत, शासन निर्णयानुसार सर्व पत्रकारांनी अधिस्वीकृती पत्रिकेसाठी जास्तीत जास्त संख्येने अर्ज करावेत. तसेच अर्ज करताना येणाऱ्या अडचणी लेखी स्वरूपात कळवाव्यात, असे आवाहन केले.

उपायुक्त उमेश बिरारी यांनी अशा कार्यशाळा पत्रकारांना नव्या दृष्टीकोनात विचार करण्यास प्रेरणा देतात, असे सांगून सर्व पत्रकारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कैलास म्हापदी यांनी त्यांच्या पत्रकारितेतील अनुभव कथन करीत बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजना, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी या योजनांबाबत माहिती दिली. पात्र पत्रकारांनी आवश्यक कागदपत्रांची तयारी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले.

श्री.संजय पितळे यांनी शासनाकडून पत्रकारांना देण्यात येणाऱ्या लाभांच्या अटी सुलभ करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे , ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव , माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संचालक (माहिती) (प्रशासन) हेमराज बागूल, संचालक (माहिती) (माध्यम आराखडा) किशोर गांगुर्डे, संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) डॉ.गणेश मुळे, कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या उपसंचालक (माहिती) अर्चना शंभरकर, ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी आणि जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर तसेच जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटनांचे विशेष मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

चर्चासत्र, प्रश्नोत्तरे आणि अनुभव कथनाच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. ही कार्यशाळा पत्रकारांसाठी केवळ माहितीपर नव्हे तर व्यावसायिक दृष्टिकोनातून व शासन-प्रशासन आणि प्रसारमाध्यमे यांच्यातील सकारात्मक संबंध वृद्धिंगत होण्यास तसेच पत्रकारितेतील नव्या वाटा शोधण्यासाठीही महत्त्वपूर्ण ठरली, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केला.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.